# पंख संस्थेमार्फत 'फ्लायिंग यंगस्टर्स' गट

**पुणे :** क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्था, यांच्यातर्फे शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत विद्यालय, खडकवासला येथील विद्यार्थ्यांमधील; नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, आव्हान स्वीकारणे अशा विविध गुणांचा शोध घेऊन त्यांचा गट बनविण्यात आला. या गटाला 'फ्लायिंग यंगस्टर' असे नाव देण्यात आले.

कार्यक्रमासाठी क्विक हिल कंपनीचे सी.एस.आर प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था प्रमुख स्मिता आपटे, यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक बांदल, शिक्षिका चौरे, येवले उपस्थित होते. अजय शिर्के व स्मिता आपटे यांनी 'शाळांगण फ्लाईंग यंगस्टर्स' गटाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे नियोजन शाळांगण समुपदेशक श्वेता सूर्यवंशी, सचिन भापकर व मृणाल मापुस्कर यांनी केले.

र दि. ३ सप्टेंबर २०१८